*बल्लारपूर विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी विकासाचे कमळ फुलवा – सुधीर मुनगंटीवार*
*भव्य रॅलीने मुल शहर भाजपामय*
*ग्रामीण भागात नागरिकांशी भेटी व संवाद*
=========================================================

गेल्या 5 वर्षात बल्लारपूर विधानसभा क्षेत्रामध्ये मी विकासाचा झंझावात निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सिंचन, रोजगार व स्वयंरोजगार, कृषी विकास, आरोग्य, सांस्कृतीक विकास, क्रिडा, पाणी पुरवठा, पायाभूत सुविधा आदी सर्वच क्षेत्रांमध्ये भरीव विकासकामे आम्ही केली आहे. मुल शहराचा चेहरामोहरा गेल्या 5 वर्षात बदललेला आहे. विकास हीच आमची शक्ती आहे. विकासाचा हा रथ आणखी वेगाने पुढे नेण्यासाठी भारतीय जनता पार्टीला मतदान करा व विकासाचे कमळ फुलवा असे आवाहन बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील भाजपा-शिवसेना-रिपाई (आ)-रासप महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

मुल शहरात दिनांक 19 ऑक्टोबर रोजी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह सुधीर मुनगंटीवार यांनी भव्य रॅली काढली. शहरातील गुजरी चौकात या रॅलीचा समारोप करण्यात आला. या सभेला संबोधताना सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, मुल शहरात बस स्थानकाचे अत्याधुनिकीकरण व नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. जलतरण तलावाचे काम प्रगतीपथावर आहे. आठवडी बाजाराचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. अत्याधुनिक मा.सा. कन्नमवार सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मुल शहरासाठी 28 कोटी रू. किंमतीची 24 x 7 पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगती पथावर आहे. ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी व पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाली आहेत. या पुढील काळातही हा झंझावात असाच सुरू राहणार आहे. हा जिल्हा, हा मतदार संघ पाणीदार करण्याचा आपला संकल्प आहे. महिला बचतगटांद्वारे उत्पादीत वस्तुंच्या विक्रीसाठी मॉल उभारणे, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी एमएसएमई पार्क उभारण्याचा आपला संकल्प आहे. या व अशा अनेक संकल्पांची पुर्तता करण्यासाठी साथ देण्याचे आवाहन सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी जि.प. च्या माजी अध्यक्षा संध्या गुरनुले, मुलच्या नगराध्यक्षा रत्नमाला भोयर, मुल भाजपाचे अध्यक्ष प्रभाकर भोयर, मुल नगर परिषदेचे उपाध्यक्ष नंदू रणदिवे, चंदू मारगोनवार, चंद्रकांत आष्टनकर आदींसह महायुतीच्या पदाधिका-यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. संपूर्ण मुल शहरात भाजपाचा जयघोष करत रॅली मार्गक्रमण करत होती. सुधीरभाऊ आगे बढो च्या जयघोषाने संपूर्ण मुल शहर भाजपामय झाले होते. गुजरी चौकात रॅलीचा समारोप झाला व सुधीर मुनगंटीवार यांनी नागरिकांना संबोधित केले.

तत्पुर्वी पोंभुर्णा तालुक्यातील चिंतलधाबा या गावात सभेला सुधीर मुनगंटीवार यांनी संबोधित केले. मुल तालुक्यातील खालवसपेठ, नलेश्वर, उथळपेठ, भेजगाव, हळदी, चिचाळा, ताडाळा या गावांना भेटी देत त्यांनी नागरिकांशी सुसंवाद साधला.